शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून अखिल भारतीय तंत्र शिक्ष
राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनि
एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयाअंतर्गत न
पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्र
वाढ/घट करण्यास शासनाची मान्यता देणेबाबत

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. टिइएम २००९/(१०३/०९)/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांकः १५ जुन, २००९

सदंर्भ :- १. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. ३३८२/११८३६/(१९०)/तांशि-१, दिनांक २१.०५.१९८३
२. संचालक तंत्र शिक्षण यांचे दिनांक १५.०६.२००९ चे पत्र

**शासन निर्णय :** शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयाअंतर्गत नव पदवी/ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास सोबत जोडले **परिशीष्ट अ** प्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास शासनाचे मान्यता देण्याचा संचालक, तंत्र शिक्षण य प्रस्तावित केले आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

आता या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेली मान्यता विचारात घे सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मधिल संस्थाना त्यांच्या नांवासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ / करण्यास व अतिरीक्त नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून खालील अटी शर्तीच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची अ औपचारिक बार्बीची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यांत भरुन इतर कायदेशीर बार्बीची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवे नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

O/C By Hand.

Principal
Pataldhamal Wadhawani College
Of Pharmacy, Yavatmal- 445001

(2)

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थां आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फ अॅक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी अॅक्ट, १९४८ च्या कल १२ मधील तरतुदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त कर घेणे बंधनकारक राहील.

८) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग अॅक्ट, १९९९ यां कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

९) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २००९०७०९१४३६१२०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :

१. संचालक, तंत्र शिक्षण , महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, (सचांलकामार्फत)
३. संबधित विद्यापीठ (सचांलकामार्फत)
४. संबधित संस्था

:प्रत माहितीसाठी :

१ अतिरीक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा माळा, चंद्रलोव बिल्डींग , जनपथ, नवी दिल्ली ११० ००१.

२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक) भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग) पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल अॅश्युरंस बिल्डींग, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०

३. निवड नस्ती/तांशि-१

Principal
Pataldhamal Wadhawani College
Of Pharmacy, Yavatmal- 445001